।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## Examination Department

Phone : (02462) 229294
Fax : (02462) 229572
Website : www.srtmun.ac.in
email : directorboee@gmail.com

संदर्भ : परीक्षा विभाग/२०२१-२२/१७६ दिनांक : ३०/०६/२०२१

महत्वाचे परिपत्रक

प्रति,

मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत पदवी व पदव्युत्तर महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्याच्या सुधारीत तारखा व ठिकाण बाबत ..
संदर्भ : १) परीक्षा/२०२१-२२/९५, दिनांक ०७/०६/२०२१
२) परीक्षा विभाग/२०२१-२२/१६३, दिनांक २५/०६/२०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्रमांक १ नुसार उन्हाळी-२०२१ मध्ये होणाऱ्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्याचे वेळापत्रक निश्चीत करण्यांत आलेले आहे. संदर्भ क्रमांक २ नुसार त्यामध्ये काही सुधारणा करण्यांत आलेल्या आहेत. परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठात सादर करावयाचे किंवा जिल्हा निहाय सादर करावयाचे याबाबत बोध होत नसल्याबाबत महाविद्यालयाकडून विचारणा होत होती. परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत पुढील प्रमाणे पुनश्च कळविण्यांत येत आहे.

अ) पदवी परीक्षा आवेदनपत्रे नियमित शुल्कासह दिनांक ०७/०६/२०२१ ते दिनांक २५/०६/२०२१ रोजी पर्यंत महाविद्यालयात स्विकारावेत तसेच दिनांक २६/०६/२०२१ ते दिनांक ३०/०६/२०२१ पर्यंत प्रति दिवस रू ५०/- विलंब शुल्क आकारून विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयातच स्विकारावेत व सर्व अर्जाची नोंद ऑनलाईन लिंक मध्ये भरावी यासाठी परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याची लिंक दिनांक ३०/०६/२०२१ रोजी पर्यंत चालू असणार आहे. या तारखेनंतर विद्यार्थ्यांचे विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयात स्विकारूनयेत व परीक्षा विभागाकडेही पाठवू नयेत. नियमित व विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र जिल्हानिहाय विद्यापीठ उपपरिसर लातूर, परभणी व न्यू मॉ.डीग्री कॉलेज, हिंगोली येथील केंद्रावर तसेच नांदेड जिल्हयातील महाविद्यालयांचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात दिनांक ०१ व ०२ जुलै, २०२१ रोजी सादर करावेत.

पदवी नियमित परीक्षा आवेदन पत्राचा धनाकर्ष / आरटीजीएस दिनांक २८/०६/२०२१ रोजी किंवा त्या पुर्वीच्या तारखेचा असावा तसेच विलंब शुल्क परीक्षा आवेदनपत्राचा धनाकर्ष / आरटीजीएस दिनांक ३०/०६/२०२१ रोजीचा किंवा त्या पुर्वीच्या तारखेचा असावा.

ब) दिनांक २६/०७/२०२१ पासून सुरू होणाऱ्या पदव्युत्तर व इतर अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र दिनांक ३०/०६/२०२१ रोजी पर्यंत स्विकारावेत. दिनांक ०१/०७/२०२१ ते दिनांक ०५/०७/२०२१ पर्यंत प्रति दिवस रू. ५०/- विलंब शुल्क आकारून विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयातच स्विकारावेत व सर्व अर्जाची नोंद

ऑनलाईन लिंक मध्ये भरावी यासाठी परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची लिंक दिनांक ०५/०७/२०२१ रोजी पर्यंत चालू असणार आहे. या तारखेनंतर विद्यार्थ्यांचे विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयात स्विकारू नयेत व परीक्षा विभागाकडेही पाठवू नयेत. नियमित व विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र जिल्हानिहाय विद्यापीठ उपपरिसर लातूर, परभणी व न्यू मॉडेल डीग्री कॉलेज, हिंगोली येथील केंद्रावर तसेच नांदेड जिल्हयातील महाविद्यालयांचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात दिनांक १२ व १३ जुलै, २०२१ रोजी सादर करावेत.

पदव्युत्तर व इतर अभ्यासक्रमांचे नियमित व विलंब शुल्क परीक्षा आवेदन पत्राचा धनाकर्ष / आरटीजीएस दिनांक ०८/०७/२०२१ रोजी किंवा त्या पुर्वीच्या तारखेचा असावा.

क) व्यावसायीक अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र यापुर्वी निर्गमित करण्यांत आलेल्या परिपत्रकानुसार वरील प्रमाणे जिल्हानिहाय केंद्रावर स्विकारण्यांत येतील.

सबब, वरील प्रमाणे परीपत्रकाची नोंद घेवून कार्यवाही करावी.

(डॉ. रवी एन. सरोदे)
प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :
१) मा.कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा.प्र.कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव :
१) मा.संचालक, विद्यापीठ उपपरिसर, लातूर,
२) मा.संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी,
३) प्र.प्राचार्य, न्यू मॉडेल डीग्री कॉलेज, हिंगोली.